‘प्रेस नोट’

दिनांक:- १७/११/२०२६.

‘‘भांडुप पोलीस ठाणेच्या हद्दीतील सराईत गुन्हेगारास MPDA कायदयान्वये स्थानबध्द केलेबाबत’’

पूर्व परिमंडळ-३ अंतर्गत भांडूप पोलीस ठाणेच्या अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नितेश व्यंकट अनभुले, वय-२८ वर्षे याचेविरुध्द भांडूप, पार्कसाईट व पंतनगर पोलीस ठाणेच्या हद्दीत खून, मारामारी, जबरी चोरी, बलात्कार यासारखे गंभीर स्वरुपाचे एकुण १२ गुन्हे दाखल आहेत.

सदर इसमाच्या सातत्यपूर्ण गंभीर गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. नमुद आरोपीत इसमाविरुध्द यापूर्वी वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन देखील त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नसल्याचे दिसून आले.

सदर इसमाच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेला निर्माण झालेला धोका लक्षात घेवून त्याच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी भांडूप पोलीस ठाणेमार्फत महाराष्ट्र विघातक कृत्यांना प्रतिबंध अधिनियम-१९८१ (**MPDA ACT**) अन्वये स्थानबध्दतेचा प्रस्ताव तयार करुन मा. पोलीस आयुक्त सो, बृहन्मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावाची सखोल छाननी करुन मा. पोलीस आयुक्त सो, बृहन्मुंबई यांनी दिनांक १३/११/२०२६ रोजी नितेश व्यंकट अनुभुले यास विहित कालावधीसाठी स्थानबध्द करण्यासाठी आदेश पारित केले त्यानुसार दि. १४/११/२०२६ रोजी भांडूप पोलीस ठाणेचे पथकाकडून त्यास ताब्यात घेवून ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी श्री. देवेन भारती मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. मनोजकुमार शर्मा, मा. पोलीस सह-आयुक्त (का व सु), श्री. धनंजय कुलकर्णी, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, मुंबई. श्री. अभयसिंह देशमुख मा. पोलीस उप आयुक्त (पूर्व परिमंडळ- ३), श्री. अजय जोशी, सहाय्यक पोलीस आयुक्त,भांडुप विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि श्रीमती सपना क्षिरसागर, पोलीस निरीक्षक विनायक जाधव, सपोनि दिपक दळवी, प्रतिबंधक अधिकारी, पोउपनि विष्णू शिंदे, पोह/निलेश सावंत, पोह/श्रीकांत माळी, पोह/संदिप परदेशी, पोशि/संतोष कातोरे, पोशि/मंगेश सिंगल, पोशि/महादेव गायकवाड यांनी सदरची प्रशसंनीय कामगिरी केली आहे.